INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# इगतपुरी तालुक्यातील ठाकुर जमातीतील आदिवासींचे धर्माचरण व कर्जबाजारीपणा यातील सहसंबंधाचा अभ्यास

**श्रीमती मोनाली नंदकिशोर देशमुख**
संशोधिका
इंदिरानगर, नाशिक

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/09.2021-54765931/IRJHIS2109025

**प्रस्तावना :**

भारतातील आदिवासी समाज हा निसर्ग पुजक असुन त्याला “मुळनिवासी” म्हणुन ओळखले जाते. आर्य आणि अनार्य समुदायाच्याही आधी आदिवासी समाज वास्तव्य करत असल्यामुळे भारताचा मुळ रहिवासी म्हणुन आदिवासी समाजाकडे पाहिले जाते. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, गुजरात, राजस्थान, बिहार, आसाम, नागालँड, केरळ इत्यादी राज्यात आजही आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर आढळुन येतो. महाराष्ट्र राज्यात देखील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, नांदेड, गडचिरोली, वर्धा, ठाणे, पालघर यासारख्या अनेक जिल्ह्यात आदिवासींचे वास्तव्य आढळुन येते.

महाराष्ट्रात प्रामुख्याने भिल्ल, कोकणी, पावरा, मावची, तळवी, वळवी, गोंड, कोरकू, ठाकुर, कातकरी इत्यादी जमाती वास्तव्य करतात. नाशिक जिल्ह्याच्या त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, घोटी, पेठ, सुरगाणा, देवळा व बागलान इत्यादी तालुक्यात विविध जमाती वास्तव्याला आहेत. इगतपुरी व घोटी तालुक्यात कातकरी व ठाकर जमातीचे आदिवासी वास्तव्य करत असुन ह्या जमाती देखील ‘निसर्गपूजक’ म्हणुन ओळखल्या जातात. या परिसरातील आदिवासी आपले धार्मिक कार्य पार पाडत असताना अनेक प्रकारच्या रूढी व प्रथांचे पालन करतो व सन - उत्सव साजरे करत असतो. वर्षभरातील ठराविक महिन्यात आदिवासींना धार्मिकविधी करने बंधन कारक मानले जाते.

यात होळी, दिपावली, दसरा, बोहडा, डोंगऱ्यादेव, लिंगोबाचा देव, जन्म विधी, मयत विधी व सुतक पूजा या सारखे विधी त्यांच्या जिवनाचा अविभाज्य भाग बनले आहे.

इगतपुरी तालुक्यातील आदिवासी हा आर्थिक दृष्ट्या मागासलेला असुन तो भुमिहिन, मजुर, वेटबिगार, कामगार, किंवा असंघटित मजुर म्हणुन ओळखला जातो. बागायती शेताचा अभाव व बारमाही रोजगाराच्या अभावामुळे या आदिवासींना सतत आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. प्रसंगी अल्प जमीन सावकाराकडे गहान ठेवून किंवा पशुधनाची विक्री करून त्यांना धार्मिक विधी किंवा सन-उत्सवाची पुर्तता करावी लागते.

प्रस्तुत शोध निबंधात आदिवासींचे धर्माचरण व त्यासंधर्भात होणारे कर्जबाजारी पणा यांचा सहसंबंध दाखविण्यात आला आहे. इगतपुरी तालुक्यातील सहा आदिवासी गावातील तीस कुटूंबाची निवड करून तथ्यांचे संकलन अभ्यासकाने केले आहे.

**संशोधनाची गरज :**

ठाकुर आदिवासी जमातीतील लोक स्वत:च हिंदु धर्मीय समजतात. त्यामुळे हिंदू धर्मातील सर्वच देवतांची पूजा करतात. त्याची सर्वच देवांना शरण जाण्याची प्रवृत्ती आहे. देवभोळेपणा आहे. तसेच जेथे देवाचे वास्तव्य असते तेथे भ्रष्टाचार न करण्याची प्रवृत्ती आहे. या जमातीत प्रत्येकाच्या कुलदेवता असतात. त्याच बरोबर स्थल देवतांनाही ही लोके मानतात. ह्या सर्व स्थल देवता निसर्गातील व पिशाच योनीतील असतात. अशी त्यांची मान्यता आहे. त्यांची ही मनोभावे प्रसंगानुरूप पूजा केली जाते.

वरिल सर्व सण-उत्सव व विधी पार पाडण्यासाठी आर्थिक तरतुदीची गरज भासते. वरिल सर्व विधी तसेच सण-उत्सव हे करावेच लागतात. अशी एक प्रकारची सक्ती ह्या जमातीतील लोकांनी स्वत:वर लादून घेतली आहे. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतुदींची गरज भासते अत्यंत गरीबीची तसेच हालाखिची परिस्थिती असल्यामुळे या जमातीतील लोक कर्ज काढतात. व उत्पन्नाचे ठोस साधन नसल्याकारणाने हे लोक कर्जबाजारी होतात. म्हणून ठाकूर जमातीतील आदिवासीचे धर्माचरण व कर्जबाजारीपणा यांतील सहसंबंधाचा अभ्यास संशोधकाने केला आहे.

**समस्या विधान :**

ठाकूर जमातीतील आदिवासींचे धर्माचरण व कर्जबाजारीपणा यांतील सहसंबंधाचा

अभ्यास, इगतपुरी तालुका

**संशोधनातील कार्यात्मक व्याख्या :**

1) ठाकूर जमात -

ठाकूर ही महाराष्ट्रातील आदिवासी जमात सह्याद्री पर्वतरांगांच्या पश्चिमेला मोठ्या प्रमाणात आढळते. माणसाची भ्रमंती संपल्यानतंत तो कोठे ना कोठेतरी स्थिर होऊ लागला. निश्चित अशी उदरनिर्वाहाची साधने लाभल्यानंतर माणसाच्या आयुष्याला स्थिरता लाभली. जगाच्या कोणत्या ना कोणत्यातरी भूभागावर त्याने आपले पाय रोवले काहींनी निसर्गाचे वरदान लाभलेल्या मोजक्या लोकवस्तीत खोडी पसंत केली तर काहींनी उद्योगधंद्यामुळे शहरे संपन्न केली, पण काही भूमिपुत्रांनी या सर्व लोकवस्तीपासून दूर व दूर्गम असलेल्या डोंगर कपाऱ्यात, नदी किनारी तळ ठोकला.

'धरतीची लेकरे' म्हणून ज्याचा सर्वार्थाने उल्लेख कतरा येईल, अशा आदिवासी समाजाने निसर्गसानिध्यात आपली दुनिया थाटली. नैसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या आदिवासींना कोणी 'जंगलचे राजे' म्हणतात तर कोणी त्यांना 'भूमिपूत्र' म्हणतात. रिसले, लेस्सी, एलवीन, मार्टिन, ए.व्ही. ठक्कर आदी त्यांना 'अगदी प्राचीन' किंवा 'अगदी मूळचे रहिवासी' म्हणतात. हटननी त्यांना 'आदिम अगर आदिवासी' असे नामाधिद्यान केले आहे. डॉ. घुर्ये त्यांना 'तथाकथित मूळचे रहिवासी व मागासलेले हिंदू' असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेत त्यांचा उल्लेख 'अनुसूचित जमात' असा केला आहे.

**उद्दीष्ट्ये :**

1) ठाकूर जमातीतील आदिवासींच्या धर्माचरणाचा अभ्यास करणे.

2) ठाकूर जमातीतील आदिवासींची आर्थिक स्थिती समजावून घेणे.

3) ठाकूर जमातीतील आदिसावींच्या कर्जबाजारीपणाच्या कारणांचा शोध घेणे.

**गृहीतके :**

1) ठाकूर जमातीतील आदिवासीच्या जीवनात धर्माचरणाचा मोठा वाटा असतो.

2) ठाकूर जमातीतील आदिवासींना धार्मिक विधी व प्रक्रियांच्या पुर्ततेसाठी आर्थिक मदतीची गरज असते.

3) ठाकूर जमातीतील आदिवासींना धार्मिक विधी व सण-उत्सव साजरे करण्यासाठी कर्ज काढावे लागते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयावर तथ्य संकलन करण्यासाठी संशोधकाने प्राथमिक व दुय्यम तथ्यांचा आधार घेतला आहे. अभ्यास क्षेत्रातील तीस कुटूंबांची निवड सहा गावातून करून असंरचित मुलाखती द्वारा माहीतीचे संकलन केले आहे. शिवाय विषयाशी निगडीत ग्रंथ, पुस्तके, मासिके व विशेषांकाच्या आधारे तथ्य संकलन केले आहे. वर्णनात्मक संशोधन आराखड्याच्या सहाय्याने तथ्यांचे विश्लेषण व अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

**नमुना निवड :**

इगतपुरी तालुक्यातील 'ठाकूर' आदिवासी वास्तव्य करत असलेल्या सहा गावे वा पाड्यातून प्रत्येकी पाच आदिवासी कुटूंब अशी एकुण तीस कुटूंबांची सहेतूक नमुना निवड पद्धतीने नमुना निश्चित केला आहे.

**तथ्याचे / माहितीचे विश्लेषण :**

आदिवासींचे धर्माचरण व कर्जबाजारीपणा ह्या घटकातील सहसंबंध शोधण्यासाठी संशोधकाने इगतपुरी ताजुक्यातील ठाकूर आदिवासी जमतींची एकुण सहा गावातील तीस उत्तरदात्यांची सहेतूक पद्धतीने निवड करून त्यांना असंरचित मुलाखतीद्वारा प्रश्न विचारले. सदरच्या मुलाखतीत उत्तरदात्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक माहिती पाणून घेणाऱ्या प्रश्नांचा समावेश करण्यात आला. ठाकूर जमातीच्या देवदेवता, उपसाना, पद्धती, धार्मिक विधी व सण समारंभबाबत माहीती जाणून घेणारे प्रश्न समाविष्ट करण्यात आले. सदरच्या माहीतीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

निसर्गाधारीत जीवन जगणारी ठाकूर जमात आपल्या दैनंदिन जीवनात धर्म उपासनेला कमालीचे प्राधान्य देत असतो. ठाकूर व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत धार्मिक क्रिया पार पाडल्या जातात. कुलदैवत, ग्रामदैवत, शिवार देवता, पाटली पुजा, कणसरामाता, होलिकोत्सव, देवदिवाळी यांसारखे उत्सव साजरे करतांना किंवा नवसपूर्ती करतांना पैसा खर्च करतो. पशूबळी देवून गावजेवण देतांना बहुतेक वेळा त्याला पैशाची उचल करावी लागते. संशोधकाच्या अभ्यास क्षेत्रातील अंदाजे 72% आदिवासी उसणवार पैसे घेवून धामि्क कार्य पार पाडत असल्याचे

आढळून आले.

अध्ययन क्षेत्रातील आदिवासी समाज किंवा जमात ही आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय असून दारिद्ग्ररेषेखालील जीवन जगणारी आहे. अल्पभूधारक, भूमीहिन मजूर, औद्योगिक कामगार किंवा वेठबिगारी करून उपजिविका भागवणारी जमात म्हणून ठाकूर जमातीकडे पाहिले जाते. ठाकर जमातीत केवह 32% लोकांकडे स्वत:ची अल्प अशी शेती असून ती जिरायत स्वरूपाची आढळून आली. शेतीतील उत्पन्न वर्षीर मिळत नसल्यामुळे या लोकांना स्थलांतर करून नाशिक व ठाणे शहरात हातमजूरीसाठी जावे लागते. 12% कुटूंबात बागायती स्वरूपाची शेती असल्यामुळे त्यांना आपल्या गावातच वर्षभर रोजगार मिळत असतो. 20% ठाकर आदिवासी पशूधनावर उपजिविका भागवताना दिसतात. तर उर्वरीत आदिवासी वनांपासून मिळणाऱ्या संपत्तीचे संकलन करून व त्यांची विक्री करून आपला उदरनिर्वाह करतात.

शोध निबंधाच्या तिसऱ्या उदिष्टांच्या उनुषंगाने असे आढळून आले की, ठाकर जमातीत अंदाजे 76% व्यक्ती कर्जबाजारी असून आरोग्यासाठी कर्ज काढणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण 11% आहे. मुलामूलींच्या विवाह व शिक्षणासाठी कर्ज काढणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण 36% असून सुमारे 49% उत्तरदाते उदरनिर्वाह व धार्मिक कार्यासाठी कर्जबाजारी झाल्याचे आढळून आले आहे. अभ्यास विषयाची महत्वपूर्ण बाब म्हणजे सदरच्या आदिवासींनी प्रापंचीक गरजा पार पाडण्यासाठी घेतलेले कर्ज हे पूर्णत: सावकारी स्वरूपाचे असल्यामुळे त्याची परतफेड करतांना त्यांना आपली स्थावर व जंगम मालमत्ता सोडण्यास भाग पाडावे लागते. बरेच आदिवासी पहिले कर्ज फेडण्यासाठी दुसरीकडून कर्ज काढतात व सरतेशेवटी वेठबिगार कामगार म्हणून जीवन जगतात.

**निष्कर्ष :**

आदिवासींच्या कर्जबारीपणात धर्माचरणाचा वाटा लक्षात येण्याजोगा असून 'ऋण काढून सण साजरे करणे' ही म्हण त्यांना तंतोतंत लागू होते. म्हणून आदिवासी समाजात कर्जबाजारीपणावर जागृती होणे काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1) भांडारकर पु. ल., समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, नागपूर

2) आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पद्धती

3) मेश्राम सुरेश, प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, मातृसंघ प्रकाशन, नागपूर

4) जाधव सु. लो., भारतातील आदिवासी समाज, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

5) कुलकर्णी कृ. पां., मराठी भाषा उद्गम व विकास, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे

6) डॉ. गारे गोविंद, सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यातील ठाकूर (ठाकर) आदिवासी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे

7) डॉ. गारे गोविंद, आदिवासी जमातींच्या नावावर सवलती लुबाडणाऱ्या जातींचा पंचनामा, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे